**<u>नियमीत दिवाणी दावा क्र.१२९/२०२१, नि.१६ वरील आदेश</u>**

वादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहितेचा आदेश ६ नियम १७ प्रमाणे गोदा युनियन कृषी सेवा सोसायटी, नायगाव, ता.सिन्नर यांना प्रतिवादी म्हणून दाव्यात समाविष्ट करण्यासाठी दाखल केला आहे. वादीने असे कथन केले आहे की, गोदा युनियन कृषी सेवा सोसायटी, नायगाव यांचे नाव ७/१२ उतारेत नमुद असल्यामुळे त्यांना दाव्यात प्रतिवादी क्र.२ म्हणून समाविष्ट करण्याची परवानगी मिळावी. प्रतिवादीने नि.२१ येथे अर्जास म्हणणे दाखल करुन अर्जास आक्षेप नोंदविलेला आहे. वादीने अर्ज उशीराने दाखल केला असून सदर संस्थेचा या प्रकरणात काय संबंध आहे त्याबाबतची कागदपत्रे दाखल केलेली नाहीत. त्यामुळे अर्ज नामंजुर करावा अशी प्रतिवादीने विनंती केली आहे

२. उभय पक्षांचा युक्तिवाद ऐकला. वादीने प्रस्तुतचा दावा हा दावा मिळकतीतील तिचा हिस्सा मिळण्याकामी दाखल केला आहे. दावा मिळकतीच्या ७/१२ उतारेचे अवलोकन केले असता प्रतिवादीचे नाव दावा मिळकतीच्या भोगवटदार सदरी नमुद आहे. तसेच, इतर अधिकारात गोदा युनियन कृषी सेवा सोसायटी, नायगाव यांचा बोजा सदर जमीनीवर असल्याचे दिसते. सदरील सोसायटी ही त्या नात्याने या दाव्यातील आवश्यक पक्षकार असल्याने त्यांना दाव्यात समाविष्ट करणे दाव्याच्या अंतीम निर्णयाकामी आवश्यक आहे. सबब, खालील आदेश पारीत करण्यात येतो,

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. वादीने प्रतिवादी क्र.२ म्हणून गोदा युनियन कृषी सेवा सोसायटी, नायगाव, ता.सिन्नर, जि.नाशिक यांचे नाव नमुद करावे व दुरुस्त दाव्याची प्रत पुढील तारखेपर्यंत न्यायालयात सादर करावी.

Sd/-xxx

**(आर.एस. कानडे)**

**दि.१०.०९.२०२४.** **दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, सिन्नर.**